# महाराष्ट्र शासन

सत्यमेव जयते

## आरोग्य सेवा संचालनालय, पुणे - ०१

संचालक, आरोग्य सेवा आयुक्तालय, मध्यवर्ती इमारत, पहिला मजला,डॉ.ॲनी बेझंट रोड, पुणे-४११ ००१

दुरध्वनी क्र.(कार्यालय)-०२०-२६१२२२५६ ई-मेल - director2pune@gmail.com

जा.क्र./संआसे/संचालक कक्ष/सन २०२६/सर्वसाधारण बदली आदेश / ९२२३-३४ दिनांक 08 JUN 2026

कार्यालयीन आदेश

विषय :- गट क संवर्गातील कर्मचा-यांच्या सन -२०२६ सर्वसाधारण बदली.

संदर्भ :-१.महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम,२००५.

२.सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र. बदली२०२६/प्र.क्र१०३/प्राआसे/दि.१५/४/२६

३. सार्वजनिक आरोग्य विभाग शासन शुध्दीपत्रक दि.५/५/२०२६

४. केंद्राचे जनगणना पत्र D.O. No. 9/12/2026-CD(Cen) दि.११/०३/२०२६

५. उपसंचालक, आरोग्य सेवा, लातुर मंडळ, लातूर यांचे पत्र क्र.३९०७-१४ /२०२६ दि.२३/०५/२०२६

६. महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश दिनांक २७/०५/२०२६

महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार व संदर्भ क्र.०५ नुसार उपसंचालक, आरोग्य सेवा, लातुर मंडळ, लातूर यांनी नागरी सेवा मंडळाच्या शिफारशीसह सर्वसाधारण बदल्यांचे प्रस्ताव या कार्यालयास सादर केले आहेत. तसेच संदर्भ क्र.०२ व ०३ च्या शासन निर्णयानुसार संचालक, आरोग्य सेवा, आयुक्तालय, पुणे यांना प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून समुपदेशनाने नागरी मंडळाने केलेल्या शिफारशीनुसार खालील कर्मचा-यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी प्रशासकीय कारणास्तव बदली आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

| उपसंचालक, आरोग्य सेवा, लातुर मंडळ, लातूर | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | कर्मचा-यांचे नाव | पदनाम | कार्यरत ठिकाण | समुपदेशनाने प्रशासकीय कारणास्तव देण्यात आलेली पदस्थापना |
| १. | श्री शेळके महिंद्र बाबुराव | सहाय्यक अधिक्षक | जिल्हा रुग्णालय धाराशिव | ग्रामिण रुग्णालय भुम जि.धाराशिव |

| उपसंचालक, आरोग्य सेवा, लातुर मंडळ, लातूर | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | कर्मचा-यांचे नाव | पदनाम | कार्यरत ठिकाण | समुपदेशनाने प्रशासकीय कारणास्तव देण्यात आलेली पदस्थापना |
| २. | श्री आग्रे अमोल गणपतराव | सहाय्यक अधिक्षक | ग्रामीण रुग्णालय तेर जि.धाराशिव | ग्रामिण रुग्णालय नांदूरघाट जि.बीड |
| ३. | श्री भारत निवृत्ती जाधव | सहाय्यक अधिक्षक | ग्रामीण रुग्णालय नांदुरघाट जि.बीड | स्त्री रुग्णालय नेकनूर जि.बीड |
| ४. | श्री पवार शामराव बाबासाहेब | सहाय्यक अधिक्षक | ग्रामीण रुग्णालय चिंचवण जि.बीड | ग्रामिण रुग्णालय रायमोहा जि.बीड |
| ५. | श्री सानप प्रकाश उमराव | सहाय्यक अधिक्षक | जिल्हा रुग्णालय बीड | ग्रामीण रुग्णालय चिंचवण जि.बीड |
| ६. | श्रीमती सपकाळ दैवशाला रमेश | सहाय्यक अधिक्षक | ग्रामीण रुग्णालय अहमदपुर जि.लातूर | ग्रामीण रुग्णालय तेर जि.धाराशिव |
| ७. | श्री सानप प्रभाकर किशनराव | सहाय्यक अधिक्षक | ग्रामीण रुग्णालय रायमोहा जि.बीड | जिल्हा रुग्णालय बीड |

१. बदली करण्यात आलेल्या कर्मचा-यांस त्यांच्या नवीन पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होण्याकरीता तात्काळ कार्यमुक्त करण्यात यावे आणि संबंधित कर्मचा-याने त्यांना दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी त्वरीत हजर होऊन त्याबाबतचा अहवाल सक्षम बदली प्राधिकारी संचालक, आरोग्य सेवा, पुणे यांना सादर करावा.

२. बदली झालेल्या कर्मचा-यांस कोणत्याही प्रकारची रजा मंजूर करण्यात येऊ नये, अन्यथा रजा मंजूर करणा-या सक्षम प्राधिका-या विरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई प्रस्तावीत करण्यात येईल.

३. बदली झालेल्या कर्मचा-याने त्यांना कार्यमुक्त केल्यानंतर अनुज्ञेय पदग्रहण अवधीतच महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढुन टाकणे यांच्या काळातील प्रदाने) मधील तरतुदीनुसार नवीन पदस्थापनेच्या ठिकाणी रुजु व्हावे.

४. जे कर्मचारी कालमर्यादेचे पालन करणार नाहीत आणि पदस्थापनेच्या ठिकाणी हजर न होता परस्पर गैरहजर राहतील, अशा कर्मचा-यांची अनुपस्थिती अनधिकृत अनुपस्थिती म्हणून समजण्यात येईल आणि त्यांचा अनुपस्थितीचा कालावधी हा अकार्यदिन (dies non) म्हणून गणला जाईल.

५. जे कर्मचारी त्यांच्या पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होणार नाहीत त्यांचेविरुध्द वेळीच प्रशासकीय कार्यवाही सुरु करावी व आवश्यकतेनुसार प्रस्ताव संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांनी या कार्यालयास सादर करावा.

६. उपरोक्त बदली प्रशासकीय कारणास्तव असल्याने कर्मचा-यांना पदग्रहण अवधी व अनुषंगिक भत्ते अनुज्ञेय राहतील.

७. आचारसंहितेचा भंग होणार नाही याची खातरजमा करुनच आपल्या स्तरावरुन उचित कार्यवाही करावी.

८. राज्यामध्ये जनगणना कार्यक्रम सुरू असल्याने वरील बदली आदेशामधील कर्मचारी यांना स्थानिक प्रशासनाने जर जनगणना कार्यक्रमात सहभागी करून घेतले असेल तर अशा कर्मचा-यांबाबत स्थानिक प्राधिका-यांचे मार्गदर्शन घेऊन कार्यमुक्तीची कार्यवाही करावी.

**सदरील आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करावी.**

(डॉ.विजय कंदेवाड)
संचालक (प्राथमिक) आरोग्य सेवा,
**पुणे.**

प्रति,
वरील नमुद सर्व संबंधित कर्मचारी.
प्रत व मार्फत :-

**उपसंचालक, आरोग्य सेवा, लातुर मंडळ, लातूर**

प्रत माहितीसाठी सविनय सादर:

१. मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा.सचिव-२, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. मा.आयुक्त तथा अभियान संचालक,राष्ट्रीय आरोग्य अभियान,मुंबई.
४. मा. संचालक आरोग्य सेवा संचालनालय,मुंबई.